Trust Reg. No. F-3967, Bombay
Maharashtra Judo Association
Affiliated to Judo Federation of India & Maharashtra Olympic Association
महाराष्ट्र ज्युदो संघटना

Adv. Dhananjay Bhonsale
President
523/63 B, 'Shivneri',
Opp ZP, Sadar Bazar, Satara 415 001
02162-234600; 94220 38778
bhonsaleds@gmail.com

Datta Aphale
General Secretary
Flat No. 401; Wing 'O'; Pethkar Samrajya,
Balawantpuram, Paud Road, Kothrud, Pune 38
Ph. 90499 98765; 94231 50231
aphaledm@gmail.com;

पुणे, 16 जानेवारी 2020

मा. अध्यक्ष / सचिव,
संलग्न आणि निमंत्रित जिल्हा ज्युदो संघटना

सर्व खेळाडू, प्रशिक्षक, पालक, पंच आणि महाज्युदो परिवारातील प्रत्येकाला महाराष्ट्र ज्युदो संघटनेतर्फे संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा!

विषय: 47 व्या सिनियर्स (पुरुष व महिला) राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा, पुणे-2020

महोदय / महोदया,

कळविण्यास आनंद होतो की, 47 वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट (सिनियर्स) पुरुष व महिला ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा दिनांक 08 आणि 09 फेब्रुवारी 2020 (शनिवार आणि रविवार) दरम्यान पुणे येथे आयोजिली आहे. सदरील स्पर्धा रोटरी क्लब ऑफ पुणे यांच्या सहकार्याने महाराष्ट्र ज्युदो संघटना आयोजित करेल. स्पर्धेचा तपशील खालील प्रमाणे;

1) स्पर्धा कालावधी: दिनांक 08 आणि 09 फेब्रुवारी 2020

2) स्पर्धेचे ठिकाण: महाराष्ट्रीय मंडळाचे सभागृह, टिळक मार्ग, पुणे.

3) स्पर्धेचे वेळापत्रक: दिनांक: 08 फेब्रुवारी 2020- **खेळाडुंचे आगमन**: दुपारी 12 वाजेपर्यंत; **वजने**: लगेचच- सणस स्टेडीयम येथे; **मॅनेजर्स मीटिंग / ड्रॉज**: 2.00 वा. स्पर्धास्थळी; संध्या. 06.00 वा. उदघाटन; नंतर लगेचच स्पर्धा प्रारंभ.
दिनांक: 09 फेब्रुवारी 2020- स्पर्धा: सकाळी 8 ते कार्यक्रम संपेपर्यंत

**सर्व सचिवांना विनंती आहे की वेळेचे आणि स्पर्धांचे वेळापत्रक लक्षात घेता आपल्या संघाच्या प्रवासाचे नियोजन तसे आखून वेळेवर संघाला स्पर्धास्थानी वेळेवर उपस्थित रहाण्याच्या सूचना द्याव्यात.**

6) शुल्क: प्रवेश शुल्क: रुपये 300/- प्रत्येकी. (सबज्युनियर्स,ज्युनियर्स आणि सिनियर्सचे निमंत्रित संघ वार्षिक शुल्क रुपये 3000/- ज्यांनी जळगाव/नंदुरबार येथे भरले नसतील त्यांना या स्पर्धेवेळी भरावे लागेल.)
भोजन व्यवस्था: दिनांक 08.02.2020 रोजी रात्रीचे भोजन; 09.02.2020 रोजी न्याहारी, दुपारचे भोजन आणि रात्रीचे भोजन याची व्यवस्था **स्पर्धा-प्रायोजकांतर्फे करण्यात आली आहे**.
निवास व्यवस्था: सणस स्टेडीयम, स्वार गेट, पुणे स्पर्धा समाप्तींनंतर दि. 09.02.2020 रोजी रहाण्याची सोय **केलेली नाही**.

7) हमी जमा : डिपॉझिट रु 1000/- प्रती संघ

8) प्रत्येक संघाच्या खेळाडूस एकाच वजनगटामध्ये खेळता येईल. पुरुष (-) 56 किलो आणि महिला (-) 44 किलो मधील विजेता राष्ट्रीय स्पर्धेस जाणार नाही. या वजनगटाव्यतिरिक्त इतर सर्व (7+7) 14 वजन गटातील विजेते राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होतील. चंदिगड येथे राष्ट्रीय स्पर्धा आयोजित होणार असल्याचे कळते आणि त्यामुळे राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होण्याकरिता राज्याचा संघ या स्पर्धेतून निवडला जाईल. यासाठी सुवर्णपदक विजेता खेळाडू आपल्या राज्याचे प्रतिनिधीत्व करेल. ज्या वजनगटामध्ये मुंबईचा खेळाडू प्रथम आला असेल तेथे लगेचच उर्वरित पदकविजेत्यांमधून स्पर्धा घेऊन / परिस्थितीनुरूप निर्णय घेऊन खेळाडूची निवड केली जाईल.

